*मुद्रा यशोगाथा*
*नाव :- श्री. प्रदीप नारायणराव धरणेवार, जि.चंद्रपूर*
*व्यवसाय :- फोटोग्राफर / व्हिडीओग्राफर*

### पंतप्रधान मुद्रा बँक योजनेमुळे फोटोग्राफीला व्हिडीओग्राफीची जोड मिळाली

*लाभार्थ्याचे मनोगत :- मोबाईलच्या प्रभावामुळे फोटोग्राफीच्या आमच्या पारंपारिक व्यवसायामध्ये पीछेहाट जाणवत होती. वडिलांपासून हा व्यवसाय आम्ही कुटुंबीय करीत आहोत. कुटुंब वाढत गेलं. माझही लग्न झालं. त्यामुळं या व्यवसायाला बंद करावा लागेल काय, असा विचार मनात आला. मात्र वडीलांनी लावलेलं रोपटं पुढही कायम राहावं, अस वाटत होतं. त्यामुळे मोठया भावाशी चर्चा केली. ज्या मोबाईलमुळे फोटोग्राफी अडचणीत आली. त्याच मोबाईलला लागणा-या एक्सेसरीचे दुकान टाकायचे मनात आले. परंतु वडील बंधू म्हणाला की, फोटो आपली ओळख आहे. त्यामुळे फोटोसोबत व्हिडीओग्राफी आपण केली तर काय बिघडले. त्यामुळे व्हिडीओ कॅमेरा घेऊन लग्नामध्ये फोटोग्राफीसोबत व्हिडीओग्राफी करण्याचा संकल्प आम्ही केला. आता प्रश्न होता पैशाचा. मात्र प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या भाषणात मुद्रा बँकेबद्दल नियमित ऐकत होतो. त्यामुळे बँकेत जाऊन चौकशी केली. माझा फोटोग्राफीचा धंदा अनेक दिवसापासून असल्यामुळे व दुकानाची ओळख गावात असल्यामुळे कर्ज मिळण्यासाठी अडचण आली नाही. व्हिडीओ कॅमेरा आला. ऐक्ससेरीचे दुकान सुरु केले. नियमित कर्ज फेड केली. मुद्रामुळे माझ्या धंदयाला बरकत आली. मी या योजनेसाठी शासनाचा आभारी आहे.*

--------------